डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere
(Established by Government of Maharashtra and Governed by Dr.Babasaheb Ambedkar Technological University Act No. XXIX of 2014)
विद्याविहार, लोणेरे - रायगड ४०२१०३ (महाराष्ट्र) Vidyavihar, Lonere - Raigad 402 103 (Maharashtra)
Tel: (02140) 275142 Student Helpline: 02140-275212
Website: www.dbatu.ac.in, E-mail: registrar@dbatu.ac.in

परिपत्रक.: डॉबाआंतंवि/क्रीडा/२०२३/३८ दि.२१/१०/२०२३

## क्रीडा विभाग

**प्रति,**

**मा. संचालक/प्राचार्य**

**सर्व संलग्नित महाविद्यालये**

**विषय:- पुणे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नागपूर, कोल्हापूर विभाग आंतर महाविद्यालयीन / विभागीय क्रीडा स्पर्धा.**

महोदय/महोदया

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटरिंग टेकनॉलॉजि अभ्यासक्रमाशी संबधित महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहेत. विद्यापीठाद्वारे खेळाडू विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा तसेच क्रीडा प्रकारांना चालना मिळावी व त्यांना आपले खेळ कौशल्य दाखवता यावे या हेतूने विद्यापीठ सातत्याने मा. कुलपती तथा महामहीम राज्यपाल यांचे वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येत असलेल्या क्रीडा महोत्सवाकरिता तसेच भारतीय विद्यापीठ संघ यांच्यामार्फत आयोजित होणार्या अखिल भारतीय पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ (All lndia West zone lnter University) क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठाचा संघ पाठवीण्यात येत असतो. सदर संघ पाठविण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ संघाची निवड राज्यातील सहा (पुणे, कोल्हापूर, सोलापूर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर) विभागांमधून करण्यात येत असते.

विद्यापीठाच्या दि. १८/१०/२०२३ रोजी पार पडलेल्या बोर्ड ऑफ स्पोर्ट्स च्या बैठकीत निश्चित केल्याप्रमाणे खालील क्रीडा प्रकारांचा समावेश क्रीडा महोत्सव आणि A.I.U. च्या स्पर्धांसाठी करण्यात आलेला आहे.

**क्रीडा महोत्सव**

**महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल व कुलपती यांचे द्वारे आयोजित करण्यात येत असलेला क्रीडा महोत्सवाचे यजमान या वर्षी** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर यांना देण्यात आली आहे. मुले व मुली यांच्या साठीच्या व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेबलटेनिस, बॅडमिंटन व ऍथलेटिक्स या क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा १२-१६ जानेवारी या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहेत. मुले व मुली यांच्या साठीच्या कबड्डी, खोखो, फुटबॉल आणि बुद्धिबळ या क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे २०-२४ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | क्रीडा प्रकार |
|---|---|
| १ | कबड्डी (मुले/मुली) (१२ खेळाडू) |
| २ | खोखो (मुले/मुली) (१२ खेळाडू) |
| ३ | व्हॉलीबॉल (मुले/मुली) (१० खेळाडू) |
| ४ | बास्केटबॉल (मुले/मुली) (१० खेळाडू) |
| ५ | फुटबॉल (मुले/मुली) (१५ खेळाडू) |
| ६ | ॲथलेटिक्स – (मुले/मुली) (१२ खेळाडू)<br>१०० मी, २०० मी, ४०० मी, ८०० मी, १५०० मी, ५००० मी, ४ X १०० मी आणि ४ X ४०० मी रिले, लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी, थाळीफेक, गोळाफेक आणि भालाफेक |
| ७ | टेबलटेनिस (मुले/मुली) (०४ खेळाडू) |
| ८ | बॅडमिंटन (मुले/मुली) (०४ खेळाडू) |
| ९ | बुद्धिबळ (मुले/मुली) (०४ खेळाडू) |

**अखिल भारतीय विद्यापीठ संघ (AIU)/पश्चिमविभागीय स्पर्धा**

| अ. क्र. | क्रीडा प्रकार |
|---|---|
| १ | क्रिकेट (Cricket) |
| २ | हॉकि (Hockey) |
| ३ | कुस्ती (Free style Wrestling) (M/W) |
| ४ | योगा (Yoga) (M/W) |
| ५ | स्विमिंग (Swimming) (M/W) |
| ६ | आर्चरी (Archery) (M/W) |
| ७ | शुटिंग (Air Rifle and Pistol Shooting) (M/W) |
| ८ | मल्लखांब (M/W) |
| ९ | फेन्सिंग (Fensing) |
| १० | जिम्नास्टीक्स (Gymnastics) (M/W) |
| ११ | वुशू (Wushu) (M/W) |
| १२ | पॉवर लिफ्टिंग (M/W) |
| १३ | वेट लिफ्टिंग (M/W) |
| १४ | क्रॉसकंट्री रेस & Walking |

**विद्यापीठ क्षेत्राचे क्रीडा विभाग**

| अ. क्र. | विभाग | जिल्ह्यांचा सहभाग |
|---|---|---|
| १ | पुणे | मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, पुणे, अहमदनगर |
| २ | कोल्हापूर | सांगली, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| ३ | सोलापूर | हिंगोली, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, बुलढाणा |
| ५ | जळगाव | जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक |
| ६ | नागपूर | नागपूर, अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ,वर्धा, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली |

**विभागीय सचिव**

दि. १८/१०/२०२३ च्या बोर्ड ऑफ स्पोर्ट्स च्या बैठकीत खालील प्रमाणे विभागीय सचिवांची सन २०२३-२४ साठी निवड करण्यात आली आहे.

| अ. क्र. | विभाग | विभागीय सचिव | महाविद्यालय |
|---|---|---|---|
| १ | पुणे | प्रा. योगेश झांबरे | इंद्रायणी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, तळेगाव दाभाडे, पुणे |
| २ | कोल्हापूर | प्रा. संदीप पाटील | नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिरिंग, पेठनाका |
| ३ | सोलापूर | प्रा. शिवशरण कोरे | ए जी पाटील इंस्टीट्युट ऑफ टेकनॉलॉजि, सोलापूर |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | प्रा. प्रसाद कुलकर्णी | एम आय टी कॉलेज ऑफ इंजिनिरिंग, छत्रपती संभाजीनगर |
| ५ | जळगाव | प्रा. आसिफ खान | गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनिरिंग, जळगाव |
| ६ | नागपूर | प्रा. मोहमद हसन | जे डी कॉलेज ऑफ इंजिनिरिंग ऐन्ड मॅनेजमेंट खंडाळा, नागपूर |

विभागीय सचिव आपल्या आपल्या विभागातील संबधित महाविद्यालांच्या क्रीडा शिक्षक/समन्वयक यांची मीटिंग आयोजित करून आपल्या विभागातील आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा/निवडचाचणी यांचे नियोजन करतील.

क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छुक महाविद्यालांनी संबधित विभागीय सचिवांशी संपर्क करून स्पर्धा आयोजानापुर्वी आपल्या कडील खेळाडूंची माहिती दिलेल्या प्रवेशिकेत भरून क्रीडा सचिव व आयोजक महाविद्यालयाकडे देणे आवश्यक आहे.

वरील सर्व खेळांसाठी विभागीय स्पर्धा / निवड चाचणी या आयोजक महाविद्यालयात विभागनिहाय घेतल्या जातील.

त्यानंतर आंतर विभागीय स्पर्धा आयोजित करून विद्यापीठाच्या अंतिम संघाची निवड केली जाईल.

विद्यापीठातर्फे केवळ वरील प्रमाणे निश्चित केलेल्या क्रीडा प्रकारांसाठीच क्रीडा महोत्सव आणि अखिल भारतीय विद्यापीठ संघाच्या स्पर्धांसाठी संघ पाठविला जाईल याची सर्व महाविद्यालांनी नोंद घ्यावी. क्रीडा महोत्सवात समाविष्ट खेळ प्रकार अखिल भारतीय संघ (AIU) किंवा पश्चिम विभागीय स्पर्धात सहृभागी होणार नाहीत.

आपल्या महाविद्यालयातील इतर खेळातील उच्च गुणवत्ता प्राप्त (Senior National/Junior National स्पर्धेत खेळलेले) खेळाडूंची माहिती १० नोव्हेंबर २०२३ पर्यंत क्रीडा विभागाकडे पाठवणे.

**स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूचे वय १७ वर्षे पूर्ण झालेले असावे ( १ जुलै १९९८ च्या पुढील ).**

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालायातील खेळाडूचा प्रवास व दैनंदिन खर्च संबधित महाविद्यालयाने करणे बंधनकारक आहे.

सर्व क्रीडा स्पर्धा दरम्यान शिस्तीचे पालन करण्यात यावे. याबाबत कोणतेही गैरवर्तन आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येईल.

विभागीय व आंतर विभागीय स्पर्धा आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांना विद्यापीठ नियमानुसार संबधित महाविद्यालया कडून विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नमुन्याप्रमाणे खर्चाचे Utilization Certificate प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाकडून क्रीडा नियमावलीनुसार अनुदान दिले जाईल.

विद्यापीठ आणि आंतर विभागीय स्पर्धा आयोजक महाविद्यालयाने नामनिर्देशित केलेली निवड समिती हि अंतिम संघाची निवड करतील आणि निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

**प्रा. एस. आर. जाधव**
**क्रीडा समन्वयक**

**प्रा. बी. एम. पुलचवाड**
**क्रीडा समन्वयक**

**प्रा.एस.जी.कराड**
**मुख्य क्रीडा समन्वयक**

प्रत.

१) मा. कुलगुरू कार्यालय (माहितीसाठी)

२) मा. कुलसचिव कार्यालय (माहितीसाठी)

३) मा. अधिष्ठाता विदयार्थी कल्याण

२) सर्व विभाग सचिव

Dr.Babasaheb Ambedkar Technological University
SPORTS
Lonere- Raigad